या प्रकरणाचा संबंध २०१२ मध्ये आयसीआयसीआय बँकेने व्हिडिओकॉन समूहाला दिलेल्या ३,२५० कोटी रुपयांच्या कर्जाशी आहे. त्या वेळी चंदा कोचर बँकेच्या प्रमुखपदी होत्या. कर्ज मंजूर करताना फसवणूक आणि अनियमितता झाल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. तपास यंत्रणेच्या आरोपानुसार, चंदा कोचर यांनी आपल्या पतीला आणि कुटुंबीयांना या व्यवहारातून लाभ होणार असल्याने व्हिडिओकॉन समूहाला कर्ज मंजूर केले होते. त्याबदल्यात व्हिडिओकॉनकडून त्यांच्या पतीच्या 'न्यू रिन्यूएबल' या कंपनीला गुंतवणूक मिळाल्याचा आरोपही सीबीआयने केला आहे. त्यानंतर हे कर्ज अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) झाले आणि बँक फसवणुकीचे प्रकरण म्हणून त्याचे वर्गीकरण करण्यात आले.

१५ मे २०२३ रोजी देण्यात आलेली मंजुरी बेकायदेशीर असून ती रद्द करण्यास पात्र आहे. त्यामुळे कायद्याच्या दृष्टीने हा मंजुरी आदेश टिकू शकत नाही आणि तो शून्य व अवैध ठरतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. आयसीआयसीआय बँकेने खटला चालवण्यास मंजुरी देताना योग्य प्रक्रियेचे पालन केले नसल्याचा दावा करत चंदा कोचर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने हा निर्णय दिला.

केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) कथित कर्ज गैरव्यवहार प्रकरणात डिसेंबर २०२२ मध्ये चंदा कोचर आणि त्यांचे पती दीपक कोचर यांना अटक केली होती. जानेवारी २०२३ मध्ये या दाम्पत्याला अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. व्हिडिओकॉन समूहाला दिलेल्या कर्जाच्या व्यवहारात देवाणघेवाण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने आयसीआयसीआय बँकेने चंदा कोचर यांच्याविरोधात खटला चालवण्यास मंजुरी दिल्याचे सीबीआयने जून २०२३ मध्ये मुंबईतील विशेष न्यायालयाला सांगितले होते. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार अशा प्रकारची मंजुरी आवश्यक आहे. कारण बँकेतील कर्मचाऱ्याला या कायद्याच्या तरतुदींनुसार लोकसेवक मानले जाते.

सरन्यायाधीशांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य

नवी दिल्ली : सरन्यायाधीश (सीजेआय) सूर्यकांत यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या वकिलाविरोधात अवमान कारवाई करण्याच्या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने (एससीबीए) दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नोटीस बजावत संबंधित वकिलाला आपले म्हणणे मांडण्यास सांगितले आहे.

न्या. दीपंकर दत्ता, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या तीन सदस्यीय खंडपीठाने ही नोटीस बजावली. अवमान कायद्याच्या कलम १५(१)(ब) अंतर्गत अॅटर्नी जनरल यांनी दिलेल्या संमतीसह याचिकेतील कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर, संबंधित वकिलाविरोधात अवमान कारवाई सुरू करण्याची एससीबीएची मागणी पुढे नेण्यास प्रथमदर्शनी योग्य आधार असल्याचे खंडपीठाने नमूद केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जानेवारी २०२७ रोजी होणार आहे.

तातडीने सुनावणीची मागणी

दरम्यान, सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायालयीन कक्षात एका वकिलाने स र न्य ाय ाध ीश ांविर ोध ात बिनबुडाचे आणि आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने त्याला सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या मदतीने बाहेर

वकिलाविरोधात अवमान कारवाईची नोटीस

काढण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासातील हा असामान्य प्रकार मानला जात आहे. सोमवारी दुपारी सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. बागची व न्या. मोहना यांच्या खंडपीठाचे कामकाज सुरू झाल्यानंतर संबंधित वकिलाने न्यायव्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराबाबत केलेल्या निवेदनावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. या संदर्भात २ नोव्हेंबर रोजी पाठवलेल्या पत्राला सरन्यायाधीशांच्या कार्यालयाकडून कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचा आरोप त्याने केला. या प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्याची विनंतीही त्याने केली.

ICICI Bank | **नोंदणीकृत कार्यालय :** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लँण्डमार्क, रेस कोर्स सर्कल, वडोदरा-३९०००७

नोंदणीकृत कार्यालय: आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लँडमार्क, रेस कोर्स सर्कल, वडोदरा- ३९०००७

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्र. २०१-बी, २रा मजला, वाय फाय आयटी पार्क बिल्डिंग, तीन हाथ नाका रोड, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र- ४००६०४.

मयत कर्जदाराच्या कायदेशीर वारसांची माहिती देण्याबाबत सूचना

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, गृहकर्ज एलबीपीयुएन००००३३२०३६९ (पत सुविधा) आयसीआयसीआय बँक लिमिटेड (बँक) द्वारे मयत नयना सागर कसबे यांच्यासह रुख्साना आजमअली यांना मंजूर करण्यात आली होती. सदर पत सुविधा फ्लॅट क्र. सी-१२, २रा मजला, सहारा प्रेस्टिज, इमारत क्र. सी, सर्व्हे क्र. १४९, नविन सर्व्हे क्र. १७७, हिस्सा क्र. ३५, गाव- फुरसुंगी, तालुका- हवेली, पुणे- ४१२३०८ येथे स्थित मालमत्तेबाबत, तारणाच्या मार्गे तारण हितसंबंध नयना सागर कसबे यांच्याद्वारे तयार करून ही कर्ज सुविधा सुरक्षित केली आहे.

आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो की, बँकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या क्षेत्रीय भेटींदरम्यान आणि नोंदणीकृत संपर्क क्रमांकावर दूरध्वनीद्वारे संपर्क साधून नयना सागर कसबे यांच्या निधनाची बातमी आम्हाला कळली आहे. या संदर्भात, कर्जदार आणि मयत नयना सागर कसबे यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर मयत कर्जदाराच्या कायदेशीर वारसांची माहिती देण्यासाठी १६ नोव्हेंबर, २०२६ रोजी पत्र पाठवण्यात आले होते.

म्हणूनच, ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत बँकेच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी सहाय्यक कागदपत्रांसह मयत नयना सागर कसबे यांच्या कायदेशीर वारसांची माहिती देण्यासाठी येथे सूचना देण्यात येत आहे.

तुम्ही वरील तपशील, श्री./श्रीम. अमर निकम, आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्र. २०१-बी, २रा मजला, वाय फाय आयटी पार्क बिल्डिंग, तीन हाथ नाका रोड, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र- ४००६०४ येथे भेट देऊन सादर करू शकता.

दिनांक : नोव्हेंबर १९, २०२६ **सही/- प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : पुणे **आयसीआयसीआय बँक लि. करिता**

नागरिकत्व मिळण्यापूर्वीच सोनियांचे नाव मतदार यादीत

दिल्ली न्यायालयाची पोलिसांकडून अहवालाची मागणी

नवी दिल्ली : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचे नाव भारतीय नागरिकत्व मिळण्यापूर्वीच मतदार यादीत समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या तक्रारीवर दिल्लीतील न्यायालयाने बुधवारी दिल्ली पोलिसांकडून कारवाई अहवाल मागवला आहे. सोनिया गांधी यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल दाखल करण्याची मागणी करणारी याचिका विकास त्रिपाठी यांनी दाखल केली आहे.

राऊस अॅव्हेन्यू न्यायालयातील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग विनोद जोशी यांनी या प्रकरणी दिल्ली पोलिसांना अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ नोव्हेंबर रोजी होणार आहे. विकास त्रिपाठी यांची मूळ तक्रार ११ सप्टेंबर २०२५ रोजी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी वैभव चौरसिया यांनी फेटाळली होती. त्यानंतर त्रिपाठी यांनी सत्र न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली. यंदा २१ सप्टेंबर रोजी सत्र न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करून तक्रारीवर नव्याने विचार करण्याचे निर्देश न्यायदंडाधिकाऱ्यांना दिले.

सोनियांच्या पुस्तकावर बंदी घाला

शिंदेसेनेच्या प्रवक्त्यांची मागणी

मुंबई: काँग्रेस नेत्या सोनिया गांधी लिखित 'बिलॉन्गिंग – अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप करत या पुस्तकावर तातडीने बंदी घालण्याची मागणी शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी बुधवारी केली. या पुस्तकातील संबंधित मजकुराचा निषेध करत शिवसेना प्रवक्त्यांनी पुस्तकाची प्रत फाडून आपला विरोध नोंदवला.

शिवसेनेचे प्रवक्ते संजय निरुपम, शायना एन.सी., आनंद दुबे, शीतल म्हात्रे, सुशीबेन शाह यांनी बाळासाहेब भवन येथे संयुक्त पत्रकार परिषद घेत सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेतला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल अपमानास्पद मजकूर प्रसिद्ध करून त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप यावेळी त्यांनी केला.

उद्धव ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

या पुस्तकावर तातडीने बंदी घालण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच सावरकर यांच्याबाबत पुस्तकात करण्यात आलेला कथित अपमान उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का, असा सवाल यावेळी त्यांनी उपस्थित केला. या मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

जाहिर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, **मे. विशाल एंटरप्राइज**, हे प्रत्येकी रु. ५०/- मूल्याचे, अनुक्रमांक १६ ते २० (दोन्ही समाविष्ट) धारण करणाऱ्या ०५ भागांचे मालक असून, सदर भाग हे भाग प्रमाणपत्र क्र. ०४ अंतर्गत जारी करण्यात आलेले आहेत आणि युनिट क्र. ४, इमारत ए, क्षेत्र मोजमाप १,१०० चौ. फूट चटई क्षेत्र, तळमजल्यावर, परमार उद्योग प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, ६-परमार इंडस्ट्रियल इस्टेट, बैल बाजार, काळे मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७० येथे स्थित, सीटीएस क्र. ३३ए धारण करणाऱ्या जमिनीवर बांधलेले, गाव कुर्ला, तालुका कुर्ला, सदर मालक आता सदर भाग आणि युनिट, त्यास संलग्न सर्व लाभ आणि विशेषाधिकारांसह तसेच सदर युनिटच्या प्रत्यक्ष कब्जासह, आमच्या अशिलांच्या नावे विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांतरण आणि अभिहस्तांकन करण्याचा इरादा बाळगतात.

उपरोक्त नमूद भाग आणि युनिट किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या किंवा हिश्श्याच्या संदर्भात कोणतेही दस्तऐवज, कागदपत्र, लेखी दस्तऐवज निष्पादित केलेल्या आणि/किंवा त्यासंदर्भात कोणतेही दस्तऐवज किंवा कागदपत्रे निष्पादित केलेल्या आणि/किंवा विक्री, गहाण, न्यास, धारणाधिकार, कब्जा, बक्षीस, वारसाहक्क, मुक्तता, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने/संस्थेने या सूचनेच्या जारी करण्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत त्यासंबंधी कागदोपत्री पुराव्यांसह सदर बाब आम्हाला कळवावी, अन्यथा अशा कोणत्याही व्यक्तीचे/संस्थेचे, त्यांच्यामार्फत, त्यांच्यासाठी किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे केलेले असे कोणतेही दावे किंवा मागण्या, हरकती किंवा अडथळे इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत आणि आमचे अशील त्यानुसार आवश्यक कागदपत्रे निष्पादित करून व नोंदणी करून मूळ मालकीहक्क दस्तऐवज आणि हस्तांतरण अर्जांसह सदर भाग आणि युनिट संपादन करण्यास पात्र असतील.

दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६.

मे. ए.एन.एस. लीगल सर्व्हिसेस यांच्यासाठी
अॅडव्होकेट्स,
१०१, विरेश्वर दर्शन सीएचएस लि., जी.बी. इंदुलकर मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७ दूरध्वनी क्र. ९८१९३९३६३५.

जाहीर नोटीस

सूचनेद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील श्री. हरमीत सिंह छाब्रा आणि श्रीमती नवजीत कौर छाब्रा यांनी प्लॉट क्र. PAP-A-584 आणि PAP-A-585, टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्र, एम.आय.डी.सी., कोपरखैरणे, ठाणे-बेलापूर मुख्य रस्ता, नवी मुंबई, जि. ठाणे – ४००७१०, क्षेत्रफळ २०० चौ. मी. मोकळी जमीन (यापुढे "सदर प्लॉट" म्हणून उल्लेख) हा प्लॉट १) श्री. रोहिदास मोरेश्वर पाटील २) श्री. हरेश्वर श्रीधर म्हात्रे, ३) श्री. हिरालाल वगताराम चौधरी,, भागीदार मे. बिकानेर स्वीट्स अँड नमकीन NX2 यांचेकडून लीजहोल्ड हक्कासह खरेदी करण्याचे मान्य केले आहे.

तरी या जाहीर सूचनेद्वारे सर्व जनतेस असे कळविण्यात येते की, सदर प्लॉटवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा/संस्थेचा कोणताही हक्क, हितसंबंध, दावा, बोजा, गहाण, लीन, लीज, सब-लीज, किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास, त्यांनी आपला दावा लेखी स्वरूपात, योग्य कागदपत्रांच्या पुराव्यासह, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी कळवावा.सदर मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, माझे अशील सदर व्यवहार कोणत्याही दाव्याचा विचार न करता पूर्ण करण्यास मोकळे असतील आणि त्यानंतर येणारा कोणताही दावा सोडून दिला आहे / माफ केला आहे असे समजण्यात येईल.

दिनांक: १९.११.२०२६
पत्ता:
सही /- **M/s. NJW LEGAL**
(नितीन वाठोरे) **ऑफिस नं. २००८, २० वा माळा, कामधेनू २३ वेस्ट,**
(खरेदीदार यांचे वकील) **ठाणे बेलापूर रोड, व्हाईट हाऊस चा बाजूला,**
कोपरखैरणे, नवी मुंबई.
मोबाईल नंबर – ९८१९६४५५४३

झोरोस्ट्रियन बँक
द झोरोस्ट्रियन को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(बहुराज्यीय अनुसूचित बँक)
नियम ८ (६) मधील तरतुदींचा संदर्भ घ्यावा

स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव किंवा लिलाव सूचना, नियम ८(६) मधील तरतुदींसह वाचावयाची.याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार(रां)ना, भागीदार(रां)ना आणि जामीनदार(रां)ना सूचित करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या तारणदार कर्जदात्याकडे गहाण ठेवलेल्या/भारित स्थावर मत्तेचा **प्रत्यक्ष कब्जा** द झोरोस्ट्रियन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला असून, सदर मत्ता **२२.१२.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते १.०० वाजेपर्यंत** "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वांवर, **श्री. जैन फार्मा/जामीनदार** यांच्याकडून ३१/१०/२०२६ रोजीची रु. १,५२,३२,४४२.६२/- ही थकबाकी तसेच **०१.११.२०२६** पासूनचे पुढील व्याज आणि इतर संबंधित खर्च वसूल करण्यासाठी विकण्यात येईल. राखीव किंमत रु. ८९,९६,०००/- आणि इसारा अनामत रक्कम रु ८,९९,६००/- असेल.

मिळकतीचा तपशील	क्षेत्र/वर्णन	राखीव किंमत
फ्लॅट क्र. १२०६, १२व्या मजल्यावर स्थित, अभिषेक हाईट्स, रुपचंद वाडा, खारकर आळी, ठाणे पश्चिम, जिल्हा ठाणे ४००६०१, (दिवंगत) श्री. भवरलाल चंपकलाल जैन यांच्या नावावर असलेला.	क्षेत्र ६८१.४८ चौ. फूट कार्पेट क्षेत्र, २ बीएचके	रु. ८९,९६,०००/-

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया बँकेच्या संकेतस्थळाचा म्हणजेच **www.zorastrianbank.bank.in** संदर्भ घ्यावा.

दिनांक: १८.११.२०२६ **प्राधिकृत अधिकारी**
स्थळ: मुंबई **द झोरोस्ट्रियन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra A GOVT. OF INDIA UNDERTAKING एक परिवार एक बैंक


अॅसेट रिकव्हरी ब्रांच :
जनमंगल, ४था मजला, ४५/४७,
मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई-४०००२३ **फोन :** ८६५७४७२९६४
ई-मेल : bom1450@mahabank.co.in/ brmgr1450@mahabank.co.in

हेतुपुरस्सर कसूरवार

आमच्या अॅसेट रिकव्हरी ब्रांचकडील एनपीए खाते साई मेडिकल अॅण्ड जनरल स्टोअर्स

तमाम जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, बँक ऑफ महाराष्ट्र ने सदर संदर्भात आरबीआय द्वारे निर्धारित आणि विहित प्रकियेचे पालन केल्यानंतर आरबीआय तसेच बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळाने जारी केलेल्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार हेतुपुरस्सर कसूरवार म्हणुन खालील व्यक्तींना घोषित केले आहे.

नाव	स्थिती (कर्जदार/संचालक/भागीदार/प्रोप्रायटर/हमीदार इ.)
साई मेडिकल अॅण्ड जनरल स्टोअर्स	कर्जदार
सौ. अलका अजयकुमार सिंग	प्रोप्रायटर/हमीदार



सौ. अलका अजय कुमार सिंग

बँकेने हेतूपुरस्सर कसूरवार म्हणुन वरील नमूद व्यक्तींना घोषित केल्याबाबत आरबीआय तसेच क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांना योग्य तो पत्रव्यवहार करून कळविले आहे.

आम्ही याद्वारे तमाम जनतेच्या माहितीसाठी हेतूपुरस्सर कसूरवारांचे छायाचित्र प्रसिद्ध करीत आहोत.

दिनांक: १८.११.२०२६ **बँक ऑफ महाराष्ट्र**
ठिकाण : मुंबई एआरबी, मुंबई दक्षिण करिता

नवी मुंबई महानगरपालिका

आरोग्य विभाग

निविदा सूचना क्र.-नमुंमपा/आरोग्य/ 13 /2026

कामाचे नांव :- नमुंमपा रुग्णालय अंतर्गत CPS/PGIMS रेसीडेंट/डॉक्टर निवासस्थान इमारतीची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई व बहुउददेशीस सेवा पुरविणेकामी बाहयंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत.

कामाची अंदाजीत किंमत :- रु. 3,10,59,388.00

निविदा कालावधी :- 05 वर्षे

निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/**यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.**

ऑनलाईन निविदा सादर करावयाची अंतिम दिनांक 07/12/2026 (दुपारी 2 वाजेपर्यंत)

सही/-
(डॉ. राजेश म्हात्रे)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1018/2026 **नवी मुंबई महानगरपालिका**

इचलकरंजी महानगरपालिका जि.कोल्हापूर
बांधकाम विभाग

जाहीर ई निविदा सूचना क्र. १५/२०२६-२७ दि. १८/११/२०२६.

- या कामांची सविस्तर टेंडर नोटीस महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड आणि संबंधीत विभागात दि.18/11/2026 रोजी प्रसिध्द केलेली आहे.
- कोऱ्या निविदा इ.म.पा. बांधकाम विभागात दि.25/11/2026 दु.2.00 वाजेपर्यन्त विकत मिळतील.
- भरलेली निविदा बांधकाम विभागाकडील पेटीत सादर करणेची अंतिम दि.25/11/2026 दुपारी 3.00 वाजेपर्यन्त राहील.
- शक्य झालेस निविदा दि. 26/11/2026 दुपारी 4.00 वाजता उपस्थित मक्तेदारांच्या समोर उघडणेत येईल.

जाहीर ई निविदा सूचना क्र. १६/२०२६-२७ दि.१८/११/२०२६.

- इचलकरंजी महानगरपालिकेकडील म.न.पा.फंड सन 2026-27 अंतर्गत 4 कामे मक्त्याने पुर्ण करुन घेण्यासाठी पात्र मक्तेदारांकडून ई- निविदा मागविणेत येत आहेत.
- सदर ई निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.19/11/2026 रोजी सकाळी 11.00 वाजले दि.25/11/2026 दु.3.00 वाजेपर्यन्त पहावयास मिळेल.
- भरलेली निविदा सादर करणेची अंतिम दि.25/11/2026 दुपारी 3.00 वाजेपर्यन्त राहील.
- शक्य झालेस निविदा दि.26/11/2026 दुपारी 4.00 वाजता उपस्थित मक्तेदारांच्या समोर उघडणेत येईल.

जा.क्रं./४८८४/२०२६ सही/-
महानगरपालिका कार्यालय अति.आयुक्त
दि.१८/११/२०२६ इचलकरंजी महानगरपालिका

प्रपत्र क्र. ६
[नियम -१५(१)(डी) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी १)
२ रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, मुंबई-४००००५.

खटला क्र.: एमए/३८/२०२४ नि. क्र.: ८

बँक ऑफ महाराष्ट्र
विरुद्ध
विक्रांत सूद

प्रति,
(१) विक्रांत विठ्ठल सूद, ब्लॉक क्र. ३५१३-८७, सेक्टर ७, वडाळा पूर्व, अँटॉप हिल, मुंबई ४०००३७, मुंबई, महाराष्ट्र - ४०००३७.
(२) लक्ष्मण बोडेकर, एऱ-२२ए, सेक्टर २१, तुर्भे ४००७०५, ठाणे, महाराष्ट्र - ४००७०५.

सूचना

ज्याअर्थी, न्यायाधिकरणाकडे सदर अर्ज दाखल केला. ज्याची प्रत यासह जोडलेली आहे. सदर विनंती केलेले अनुतोष का मंजूर करू नयेत, याची कारणे दाखविण्यासाठी तुम्हाला सूचना देण्यात आली. सूचना घ्यावी की, सदर अर्ज **न्यायाधिकरणाद्वारे २४-१२-२६ रोजी स. ११.३० वा.** किंवा न्यायाधिकरणाच्या सोयीनुसार त्यानंतर लगेचच अशा वेळी सुनावणीसाठी घेण्यात येईल.

२. तुम्हाला व्यक्तीशः किंवा यथायोग्य माहिती असलेल्या प्लिडर्स/वकिलांमार्फत हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत आणि तुमचा प्रतिसाद काही असल्यास नोंद करणे.

३. याद्वारे सूचना घ्यावी की, येथे वरील नमूद दिवशी तुम्ही हजर राहण्यास कसूरवार ठरल्यास, तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होईल आणि निर्णय केला जाईल.

सदर दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने दिले.

समन्स जारी करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी.
प्रबंधक
टीप : लागू नसलेला मजकूर खोडून टाकावा. **मुंबई डीआरटी क्र. १**

गुंतवणूकदारांच्या माहितीसाठी एक प्रशिक्षण आणि जागरूकता उपक्रम

म्युच्युअल फंडासंबंधी अधिक माहितीसाठी ह्या कार्यक्रमात सहभागी व्हा.

दिनांक व ठिकाण:

रविवार, 22 नोव्हेंबर 2026; सकाळी 11:00 वाजल्यापासून.
हॉटेल रेडविंग्स कॅसल, ओरियन मॉल व न्यू पनवेल ब्रिज जवळ, जुना मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, पनवेल - 410 206, महाराष्ट्र.
नोंदणी करण्यासाठी, कृपया कॉल करा: रागिणी दाभाडे, मोबाइल: 91567 93375.
रविवार, 22 नोव्हेंबर 2026; सकाळी 11:00 वाजल्यापासून.
सेंट्रल पॉइंट बँक्वेट हॉल, सेंट्रल पार्क रोड, ओसवाल नगरी, नालासोपारा पूर्व, वसई-विरार, पालघर - 401 209, महाराष्ट्र.
नोंदणी करण्यासाठी, कृपया कॉल करा: प्रतीक तांबे, मोबाइल: 76780 95456.
नोंदणी अनिवार्य आहे. नोंदणीची वेळ सकाळी 9:30 ते सायंकाळी 5:30 पर्यंत असेल.
वॉक-इनला परवानगी दिली जाणार नाही.

HDFC MUTUAL FUND BHAROSA APNO KA
An Investor Education and Awareness Initiative

म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यासाठी नो युवर कस्टमर (केवायसी) च्या आवश्यकता एकदाच पूर्ण करण्यासंबंधी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी https://www.hdfcfund.com/information/key-know-how येथे भेट द्या. गुंतवणुकदारांनी फक्त नोंदणीकृत म्युच्युअल फंडांसोबत व्यवहार करावा, ज्यांचा तपशील सेबीच्या वेबसाईटवर (www.sebi.gov.in/intermediaries.html) तपासून पाहता येईल. कोणत्याही प्रकारची चौकशी, तक्रार असल्यास किंवा तक्रार निवारणासाठी गुंतवणूकदार एएमसीज आणि/किंवा इन्व्हेस्टर रिलेशन्स अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात. त्याचबरोबर, गुंतवणूकदार एएमसीजकडे थेट तक्रारी नोंदवू शकतात, एएमसीज कडून देण्यात आलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही तर https://scores.sebi.gov.in वरील स्कोअर्स पोर्टलद्वारे ते तक्रार करू शकतात. स्कोअर्स पोर्टल द्वारा गुंतवणूकदारांना सेबी कडे ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची आणि नंतर त्याची स्थिती तपासून पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. जर एएमसीजकडे थेट केलेल्या अथवा स्कोअर्स पोर्टलद्वारे केलेल्या तक्रारीवर मिळालेल्या प्रतिसादाने गुंतवणूकदारांचे समाधान झाले नाही तर ते https://smartodr.in/login वरील स्मार्ट ओडीआर वर कोणतीही तक्रार नोंदवू शकतात.

म्युचुअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींच्या अधीन असते, योजनेशी संबंधित सर्व दस्तावेज काळजीपूर्वक वाचावेत.

फॉर्म क्र. १६
(नियम ३४(३) पहा)

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र.२ मुंबई येथे
३ रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, मुंबई ४०० ००५.

कर्ज वसुली आणि दिवाळखोरी कायदा, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ४८ अंतर्गत स्थावर मिळकतीच्या जप्तीचे वॉरंट

निशाणी क्र. १५
पुढील दिनांक: २५.११.२०२६

वसुली कार्यवाही क्र. १८/२०२५

पेगासस अॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
विरूध्द
मे. लीला एंटरप्रायझेस आणि इतर.

प्रति,
सीडी १ मे. लीला एंटरप्रायझेस, त्यांचे एकमेव मालक श्री. निवास जी. मोरे यांच्यामार्फत, ५५६/२१, गणेशवाडी, सेनापती बापट मार्ग, दादर पश्चिम, मुंबई-४०००२८.
सीडी २ श्री. निवास गजानन मोरे, मे. लीला एंटरप्रायझेसचे एकमेव मालक, ५५६/२१, गणेशवाडी, सेनापती बापट मार्ग, दादर-पश्चिम, मुंबई-१०० ०२८.
सीडी ३ श्री. जेरार्ड जोसेफ ताओ, बी-५०४, ५वा मजला, मधुना बिल्डिंग, गोविंदराव पटवर्धन मार्ग, दादर-पश्चिम, मुंबई-४०० ०२८.
सीडी ४ नरेंद्र कृष्णाजी पवार, ई-३९, नंदादीप लिव्हरेस्ट सीएचएस लि., चेंबूर (पूर्व), मुंबई-४०० ०७१.

ज्याअर्थी तुम्ही मे. लीला एंटरप्रायझेस (सीडी क्र. १) श्री. निवास गजानन मोरे (सी.डी. क्र. २), श्री. जेरार्ड जोसेफ ताओ (सी.डी. क्र. ३) व नरेंद्र कृष्णाजी पवार (सी.डी. क्र. ४) यांनी सन्माननीय पीठासिन अधिकारी **कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई** यांनी काढलेल्या **मूळ अर्ज क्र. २५१ सन २०२०** मधील **वसुली प्रमाणपत्र क्र. १८ सन २०२५** नुसार देय असलेली रु. ८,६७,१०,४७७.१२/- **(रुपये आठ कोटी सदुसष्ट लाख दहा हजार चारशे सत्याहत्तर आणि बारा पैसे मात्र)** इतकी रक्कम, तसेच ०७-१२-२०१८ रोजी पासून प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत वार्षिक @ १३.५०% च्या दराने पुढील व्याजासह खर्च ही रक्कम चुकती करण्यात कसूरवार ठरले आहात.

याद्वारे आदेश देण्यात येतो की, सदर वसुली कार्यवाहीतील प्रमाणपत्र कर्जदार किंवा त्यांचे सेवक किंवा एजंट किंवा हितसंबंधित प्रतिनिधी किंवा प्रमाणपत्र कर्जदारांच्या अंतर्गत मालकीचा दावा करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तींना, पुढील आदेश होईपर्यंत, खाली नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करणे, अन्य व्यक्तीच्या नावे करणे, तृतीय पक्षाचे हितसंबंध निर्माण करणे, कब्जा सोडणे, बोजा निर्माण करणे किंवा कोणताही व्यवहार करणे अथवा त्यातून उद्भवणाऱ्या पैशाच्या आणि/किंवा मिळकतीच्या स्वरूपातील कोणत्याही लाभाशी व्यवहार करण्यास याद्वारे मनाई व प्रतिबंध करण्यात येत आहे. तसेच सर्व व्यक्तींना अशा हस्तांतरणातून, अन्य व्यक्तीच्या नावे करण्याच्या व्यवहारातून, कब्ज्यातून किंवा बोज्यातून कोणताही लाभ घेण्यास मनाई करण्यात येत आहे.

तुम्हाला याद्वारे वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई यांच्यासमोर २५/११/२६ रोजीस दु. २.३० वा. उपस्थित राहणे आवश्यक आहे.

मिळकतीचा तपशील
स्थावर मिळकत

ई/३९, नंदादीप एव्हरेस्ट सीएचएस, आदर्श विद्यालय हायस्कूलजवळ, शेल कॉलनी रोड, चेंबूर (पूर्व), मुंबई ४०००७१ (फ्लॅट क्षेत्रफळ ३११८ चौ. फूट) (बांधकामीत क्षेत्रफळ १०२२ चौ. फूट) (प्रतिवादी क्र. ४ यांच्या मालकीची).

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ०५/११/२०२६ रोजी दिले.

सही/- चेतन जे. भिगाडे
वसुली अधिकारी, डीआरटी-२, मुंबई

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील मे. रंगोली डेव्हलपर्स यांच्या सूचनांनुसार, त्यांनी (i) समद अहमद शेख, (ii) अमजद अहमद शेख, (iii) अंजुमनीसा यासीन मलिक, (iv) नजमुन्निसा आरिफ शेख, (v) अफजल अहमद शेख, (vi) सेहर अहमद शेख, (vii) सुमैया अहमद शेख, (viii) जैबुन्निशा अहमद शेख, (ix) तबस्सुम अल्ताफ शेख, (x) शाहिस्ता अश्रफ खान आणि (xi) शगुफ्ता अयुब खान यांच्याकडून खरेदी करण्याचे मान्य केलेल्या खाली नमूद मिळकतीवरील त्यांच्या सर्व बोजांपासून मुक्त असलेल्या हक्क, मालकीहक्क आणि हितसंबंधांची आम्ही चौकशी करीत आहोत.

मिळकतीचे वर्णन

सांताक्रूझ (पूर्व), वांद्रे येथे स्थित मालकी हक्काचा भूखंड, नगर रचना योजना सांताक्रूझ क्र. खखख (सुधारित) मधील अंतिम भूखंड क्र. ४३-बी, क्षेत्र मोजमाप ५५८ चौ. यार्डस आणि नगर रचना योजना सांताक्रूझ क्र. III (सुधारित) मधील अंतिम भूखंड क्र. ४३-ए, क्षेत्र मोजमाप ५०० चौ. यार्डस त्यास अनुरूप गाव वांद्रे-I, तालुका वांद्रे येथील सीटीएस क्र. २३९, २३९/१ ते २३९/७ धारण करणारे, नोंदणी उपजिल्हा वांद्रे, जिल्हा मुंबई उपनगर, बृहन्मुंबईच्या हद्दीत, "एच" विभाग क्र. ६७७० (२) रस्ता क्र. ६०-ए मध्ये स्थित, एकूण क्षेत्र मोजमाप १०५८ चौ. यार्डस म्हणजेच ८८४.५९ चौ. मीटर्स, सिटी सर्व्हे अभिलेखानुसार आणि प्रत्यक्ष मोजमापानुसार क्षेत्र मोजमाप ७७८.५ चौरस मीटर्स, ज्यामध्ये "वसीम व्हिला" म्हणून ओळखली जाणारी तळमजला आणि दोन वरचे मजले व एक बंदिस्त गॅरेज असलेली इमारत समाविष्ट असून, त्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:

उत्तर दिशेस किंवा त्या बाजूस : अंशतः सीटीएस क्र. २३८ धारण करणारी जमीन आणि अंशतः सीटीएस क्र. २४० धारण करणारी जमीन;
दक्षिण दिशेस किंवा त्या बाजूस : ५ वा रस्ता;
पश्चिम दिशेस किंवा त्या बाजूस : पश्चिम रेल्वे मार्ग;
पूर्व दिशेस किंवा त्या बाजूस : सीटीएस क्र. २४२ धारण करणारी जमीन;

उपरोक्त नमूद मिळकतीवर आणि/किंवा त्यावर उभ्या असलेल्या इमारतीवर/बांधकामावर विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, बक्षीस, न्यास, वाटणी, वारसाहक्क, कब्जा, वहिवाट, निर्वाहभत्ता, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, भाडेकरार, पोटभाडेकरार, परवाना, धारणाधिकार, सुखाधिकार, कोणताही करार, हस्तांतरणपत्र, लेखी कागदपत्र, मृत्युपत्राद्वारे प्रदान, मृत्युपत्रीय दान, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालयीन वाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा न्यायालयीन आदेश, कंत्राट, विकास हक्क, एफएसआय किंवा टीडीआर किंवा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हिस्सा, हक्क, मालकीहक्क, लाभ, हितसंबंध, दावा, हरकत किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर बाब या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यांसह जी-१६ विरेश्वरधारा, ११७-ए, बजाज रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०५६ येथे अधोहस्ताक्षरीतांना लेखी स्वरूपात कळवावी, अन्यथा असा दावा, असल्यास, त्याचा त्याग केलेला आणि/किंवा सोडून दिलेला मानला जाईल आणि आम्ही अशा दाव्याचा कोणताही संदर्भ न घेता उपरोक्त मिळकतीवरील आमच्या अशिलांचा मालकीहक्क स्पष्ट, विक्रीयोग्य आणि सर्व बोजांपासून मुक्त असल्याचे प्रमाणित करू.

दिनांक: १९ नोव्हेंबर, २०२६

मे. महिमतुरा अँड कं.(उपनगर)
अॅडव्होकेट्स

वसई विकास सहकारी बँक लि.
(शेडयुल्ड बॅक)
चिमाजीअप्पा मैदानासमोर, वसई गाव, एस. टी. स्टँड जवळ, वसई, पालघर. ४०१२०१ दुरध्वनी कं. ८५९९१८७९७४
email address: sandeep.Jadhav@vasaivikasbank.co.in

ताबा नोटीस
[संदर्भ नियम ८ (१)]

अधिकृत अधिकारी, वसई विकास सहकारी बँक लि., सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेटस् अॅन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट [अॅक्ट २००२ (२००२ चा ५४)] व कलम १३ (१२) (नियम ३) सिक्युरीटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स २००२ या कायदयाअंतर्गत, **दि.०६/०८/२०२६** रोजी मागणी नोटीस जारी करून कर्जदार **मे. श्री प्रणव इंन्टरप्रायजेस प्रोप. श्री. हेमंत अर्जुन चौधरी यांना नोटीस मध्ये नमुद केलेल्या रक्कम रू. ३,०८,०९५/- (रु. तीन लाख आठ हजार पंच्याण्णव मात्र)** नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सुचित केलेले आहे.

कर्जदार कर्जाची रक्कम परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने सर्वसाधारण जनतेला नोटीस देण्यात येते की, सदर कायदयाच्या कलम १३ च्या (उप कलम ४) अंतर्गत नियम ८ अन्वये बँकेच्या अधिकृत अधिका-याने **दि. १८ नोव्हेबर २०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारपणे जनतेला या नोटीस व्दारे कळविण्यात येत आहे की, सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. सदर मालमत्ता ही वसई विकास सहकारी बँकेत **रू. ३,१७,९९८/- (रु. तीन लाख सतरा हजार नऊशे अठ्ठयाण्णव फक्त)** इतक्या रकमेस व त्यावरील व्याज यांस अधीन आहे.

कलम १३ च्या (उप कलम ८) च्या कायदयाच्याअंतर्गत कर्जदार व तारणकर्ते यांचे याव्दारे लक्ष वेधण्यात येत आहे की, सदरची सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी थकीत कर्जाची रक्कम परतफेड उपलब्ध कालावधी मध्ये करण्यात यावी.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

सदनिका कं. - ४, ज्याचे क्षेत्रफळ ४१३ चौ. फु. (Built up), पहिला मजला, इमारत क. ३, सुंदर ए आणी बी कॉ. हौ. सो. लि., स्वस्तिक पार्क कॉम्प्लेक्स हे गट नं.५७ पीटी, गाव कर्दळ, सफाळे पूर्व ता. अणि जिल्हा पालघर येथे असून सदरची मालमत्ता ही जिल्हा व उप- जिल्हा पालघर च्या स्थळसिमेमध्ये आहे.

सही /-
दि. १८.११.२०२६ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : वसई **वसई विकास सहकारी बँक लि.**

ImagicaaWorld

इमॅजिकावर्ल्ड एंटरटेनमेंट लिमिटेड

सीआयएन: एल९२४९०एमएच२०१०पीएलसी१९९९२५
नोंदणीकृत कार्यालय: ३०/३१, सांगडेवाडी, खोपोली-पाली रोड, तालुका खालापूर, जिल्हा रायगड ४१० २०३, महाराष्ट्र, भारत
कॉर्पोरेट कार्यालय: ए-३०१, तिसरा मजला, व्हीआयपी प्लाझा, वीरा देसाई इंडस्ट्रियल इस्टेट, ऑफ न्यू लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५३, महाराष्ट्र, भारत, **दूरध्वनी:** +९१ २२ ६९८४ ००००;
ई-मेल: compliance@imagicaaworld.com **वेबसाईट:** www.imagicaaworld.com

विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, इमॅजिकावर्ल्ड एंटरटेनमेंट लिमिटेड ("कंपनी") ची विशेष सर्वसाधारण सभा क्र. ०१/२०२६-२७ ("ईजीएम") **शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम"), सदस्यांच्या कोणत्याही प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, कंपनीज अॅक्ट, २०१३ ("कायदा") च्या लागू तरतुदी आणि मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने जारी केलेली संबंधित परिपत्रके व या संदर्भात जारी केलेली संबंधित परिपत्रके ("परिपत्रके") तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स") यांच्या तरतुदींचे पालन करून, ईजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात येणार आहे.

वरील परिपत्रकांचे पालन करून, कंपनीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे ईजीएमची सूचना अशा सर्व सदस्यांना पाठविली आहे, ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ("डीपीज") किंवा कंपनीचे रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ("एमयूएफजी इनटाइम"/"आरटीए") यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. सदर सूचना कंपनीच्या वेबसाईट https://www.imagicaaworld.com/, स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटवर म्हणजेच बीएसई लिमिटेड ("बीएसई") च्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड ("एनएसई") च्या www.nseindia.com तसेच एमयूएफजी इनटाइमच्या https://instavote.linkintime.co.in या वेबसाईटवरही उपलब्ध करून देण्यात येईल.

कंपनीज (मॅनेजमेंट अँड अॅडमिनिस्ट्रेशन) रूल्स, २०१४ च्या नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या कायद्याच्या कलम १०८ च्या तरतुदींनुसार, वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, तसेच सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेल्या सर्वसाधारण सभांवरील सेक्रेटेरियल स्टँडर्ड (एसएस२) नुसार, कंपनीला आपल्या सदस्यांना एमयूएफजी इनटाइमद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली "रिमोट ई-व्होटिंग" सुविधा प्रदान करताना आनंद होत आहे, ज्यामुळे सदस्यांना सदर सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदान करता येईल. एमयूएफजी इनटाइमच्या ई-व्होटिंग प्रणालीचा वापर करून मतदान करण्याची प्रक्रिया ईजीएमच्या सूचनेमध्ये वर्णन करण्यात आली आहे.

रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी मंगळवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता (आयएसटी) सुरू होईल आणि गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता (आयएसटी) समाप्त होईल. या कालावधीत, कट-ऑफ तारीख म्हणजेच शुक्रवार, दिनांक ४ डिसेंबर, २०२६ रोजी प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे कंपनीचे सदस्य रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करू शकतील. त्यानंतर मतदानासाठी एमयूएफजी इनटाइमद्वारे रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल. सदस्याने एखाद्या ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर, त्याला त्याचे मत नंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदस्यांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरणा झालेल्या इक्विटी शेअर भांडवलातील त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात असतील. ही सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादन करणारी आणि कंपनीची सदस्य बनणारी कोणतीही व्यक्ती, जी कट-ऑफ तारीख म्हणजेच शुक्रवार, दिनांक ४ डिसेंबर, २०२६ रोजी इक्विटी शेअर(र्स) धारण करत असेल, ती मतदान करण्यासाठी आणि ईजीएममध्ये उपस्थित राहण्यासाठी ईजीएमच्या सूचनेमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करू शकते. ईजीएममध्ये उपस्थित असलेले आणि रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावांवर मतदान न केलेले सदस्य सभेदरम्यान ई-व्होटिंग सुविधेद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. ईजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले सदस्य ईजीएममध्ये उपस्थित राहण्यास/सहभागी होण्यास पात्र असतील; तथापि, त्यांना ईजीएमदरम्यान पुन्हा मतदान करण्यास पात्र मानले जाणार नाही.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या डीपीजकडे नोंदणीकृत/अद्ययावत करण्याचा आणि प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे आणि/किंवा तिच्या आरटीएकडे नोंदणीकृत/अद्ययावत करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

ई-व्होटिंग किंवा व्हीसी/ओएव्हीएमद्वारे ईजीएममध्ये उपस्थित राहण्यासंदर्भात कोणत्याही शंका किंवा समस्या असल्यास, आपण enotices@in.mpms.mufg.com या ई-मेल पत्त्यावर ई-मेल पाठवू शकता किंवा दूरध्वनी क्र.: ०२२ - ४९१८ ६००० वर संपर्क साधू शकता.

इमॅजिकावर्ल्ड एंटरटेनमेंट लिमिटेडकरिता
सही/-
ठिकाण: मुंबई श्वेता सिंग
दिनांक: १८ नोव्हेंबर, २०२६ कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी